क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
***मुंबई - ४०० ०१९.***

## प्रशासकीय परिपत्रक क्र. १३३ दिनांक २० / ११ / २००७

विषय : मंत्र्यांचा दर्जा दिलेल्या व्यक्तींनी आयोजित केलेल्या बैठकांना कंपनीच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित न रहाण्याबाबत.

संदर्भ : १) शासन परिपत्रक नियोजन विभाग क्र.तापसु-१०९०/सीआर-४०/योजना-५, दि. ३०.०६.१९९०.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र : मुस-१०९२/प्र.क्र.६५/१, दि. ०१.०८.१९९२
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र: मुस-१०९५/प्र.क्र.१/१, दि. ३१.०५.१९९५
४) शासन परिपत्रक, मुस-२०००/प्र.क्र.३२/१ दि. २३.०८.२०००

....

महाराष्ट्र शासनाने शासन परिपत्रक क्र.तापसु-१०९०/सीआर-४०/योजना-५ दि.३०.०६.१९९० अन्वये मंत्र्यांचा दर्जा देण्यात आलेल्या व्यक्ती व तालुका समन्वय व पुनर्विलोकन समित्या यांच्या कार्यकक्षा स्पष्ट केल्या आहेत. या संदर्भात शासनाने निर्गमित केलेली परिपत्रके अवलोकनार्थ व योग्य कार्यवाहीस्तव सोबत जोडली आहेत.

२. शासनाने निर्गमित केलेल्या या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३. हे प्रशासकीय परिपत्रक व्यवस्थापकीय संचालक यांच्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

*( सु. य. पाटील )*
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रत रवाना :

विभागीय स्तरावरील सर्व कार्यालयांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*K/Adm.Circular F.N.348*

मंत्र्यांचा दर्जा देण्यात आलेल्या व्यक्ती व
तालुका समन्वय व पुनर्विलोकन समित्या
यांच्या कार्यक्षेत्राबाबत.

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
परिपत्रक क्रमांक : तासपू-१९९०/सीआर-४०/योजना-५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० जून, १९९०

## परिपत्रक

विधानसभा आणि विधान परिषद यातील विरोधी पक्ष नेते, राज्य शासनाच्या काही उपक्रमांचे आणि उच्चस्तरीय समित्यांचे अध्यक्ष, इत्यादी शासन व्यवस्थेच्या बाहेरच्या काही महत्वाच्या अशासकीय व्यक्तींना शासनाने मंत्र्यांचा दर्जा दिला आहे. असा दर्जा देण्यामागे त्या व्यक्तींना त्यांनी धारण केलेल्या पदामुळे त्यांच्यावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या नीटपणे पार पाडता याव्यात हा मुख्य हेतू आहे. त्यादृष्टीने मंत्र्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या काही सुयोग्य सोयी व सुविधा या व्यक्तींना उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. परंतु, शासनाच्या मंत्र्यांना संबंधित प्रशासकीय कामावर देखरेख करण्याचे वा संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करुन अथवा त्यांना भेटीसाठी बोलावून व त्यांचेशी विचारविनिमय करुन त्यांना सूचना वजा आदेश देण्याचे ज्याप्रमाणे अधिकार आहेत त्याप्रमाणे केवळ मंत्र्यांचा दर्जा देण्यात आलेल्या अशा अशासकीय व्यक्तींना कोणतेही अधिकार नाहीत व ती त्यांची कार्यकक्षाही नव्हे हे याद्वारे शासन स्पष्ट करु इच्छिते." दैनंदिन प्रशासकीय कामकाजात वा शासनाच्या योजना, प्रकल्प, धोरणे यांच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेत अशा व्यक्तींचा हस्तक्षेप होणार नाही, अशी शासनाची अपेक्षा आहे. उपरोक्त अशासकीय व्यक्तींना मंत्र्यांचा दर्जा देण्यामागची शासनाची वर स्पष्ट केलेली भूमिका संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

२. तालुका समन्वय व पुनर्विलोकन समित्यांचे नियोजन विभागाच्या दिनांक १६ मे, १९९० च्या शासन निर्णयानुसार पुनर्गठन करण्यात आलेले आहे. तसेच त्यानुसार या समित्यांची कार्यकक्षा देखील पूर्वीपेक्षा थोडी बदलण्यात आलेली आहे. या कार्यकक्षेबाबत या आदेशात असे स्पष्ट म्हटले आहे की, "शासनाची उद्दिष्टे अधिक हेतूपूर्वक रितीने प्रत्यक्षात आणण्यासाठी पुढील क्षेत्रातील विविध कार्यक्रम

व योजनांचा आढावा घेऊन त्या सुधारणेबाबत अंमलात आणण्याच्या दृष्टीने समिती शासनास <u>शिफारशी / सूचना</u> करील" या सुधारित आदेशावरुन हे स्पष्ट होईल की, पुनर्रचित तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीचे स्वरूप सल्लागार पध्दतीचे आहे. या समितीने आपला सल्ला देण्याची भूमिका समिती म्हणूनच निभावणे आवश्यक आहे. या समितीचे अध्यक्ष विधानसभा सदस्य यांच्याकडून वैयक्तिकरित्या कुठल्याही प्रकारच्या शासकीय कार्यवाहीची अपेक्षा नाही, त्यांनी समितीमार्फतच आपले कार्य करणे शासनाला अभिप्रेत आहे. हे स्पष्टीकरण देऊन संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

५. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

द. म. सुकथनकर

[ द. म. सुकथनकर ]
मुख्य सचिव

सर्व मंत्री / राज्यमंत्री,
सर्व प्रधान सचिव / सचिव आणि सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांचे नियंत्रणाखालील सर्व खाते प्रमुख

...मंत्र्यांचा दर्जा दिलेल्या व्यक्तींनी आयोजित केलेल्या बैठकांना शासकीय अधिका-यांनी उपस्थित न राहण्याबाबत...

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-मुस-1092/प्र.क्र.65/एक,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 1 ऑगस्ट, 1992.

## परिपत्रक

शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्रमांक: तासपू-1090/सीआर-40/योजना-5, दिनांक 30 जून, 1990 अन्वये खालीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत :-

(1) विधानसभा आणि विधान परिषद यातील विरोधीपक्ष नेते, राज्य शासनाच्या काही उपक्रमांचे आणि उच्चस्तरीय समित्यांचे अध्यक्ष इत्यादी महत्वाच्या अशासकीय व्यक्तींना शासनाने मंत्र्यांचा दर्जा, त्या व्यक्तींना त्यांनी धारण केलेल्या पदामुळे त्यांच्यावर पडणा-या जबाबदा-या नीटपणे पार पाडता याव्यात या हेतूने दिलेला आहे.

(2) ज्याप्रमाणे शासनाच्या मंत्र्यांना संबंधित प्रशासकीय कामावर देखरेख करण्याचे व संबंधित अधिका-यांची बैठक आयोजित करून अथवा त्यांना भेटीसाठी बोलावून व त्यांचेशी विचारविनिमय करून त्यांना सूचना-वजा आदेश देण्याचे अधिकार आहेत त्याप्रमाणे अधिकार मंत्र्यांचा दर्जा देण्यात आलेल्या विधानसभा व विधान परिषद यातील विरोधी पक्षनेते, इत्यादी अशासकीय व्यक्तींना नाहीत व ती त्यांची कार्यकक्षा नव्हे.

(3) दैनंदिन प्रशासकीय कामकाजाच्या व शासनाच्या योजना, प्रकल्प धोरण यांच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेत वरील (1) येथील अशासकीय व्यक्तींनी हस्तक्षेप करू नये.

वरीलप्रमाणे स्पष्ट शासन आदेश अस्तित्वात असूनही असे निदर्शनास आले आहे की, विधानसभा व विधान परिषद यातील विरोधी पक्षनेते, शासकीय अधिका-यांच्या बैठका बोलावितात व त्यांनी बोलाविलेल्या बैठकांना शासकीय अधिका-यांनी उपस्थित रहावे अशा सूचना देतात व शासकीय अधिकारी अशा बैठकांना उपस्थित रहातात. तसेच असेही निदर्शनास आले आहे की, विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या कामाचा भाग म्हणून एखाद्या जिल्ह्याच्या ठिकाणी दौरा केल्यास शासकीय अधिकारी त्यांच्याबरोबर अशा दौ-यात सहभागी होतात. शासकीय अधिका-यांच्या या प्रकारच्या कृतीमुळे उपरोल्लेखित शासन आदेशांचे अनुपालन होण्यास कुचराई होत आहे हे स्पष्ट आहे. याकरिता वरील परिपत्रक व विशेषत: वरील परिच्छेदात निर्देशित केलेल्या सूचना शासनाच्या सर्व स्तरांवरील अधिका-यांच्या पुन्हा एकदा निदर्शनास या परिपत्रकाद्वारे आणण्यात येत आहेत. शासकीय अधिका-यांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अशी शासनाची अपेक्षा आहे. विधानसभा व विधान परिषदांचे विरोधी पक्षनेते आणि अन्य महत्वाच्या अशासकीय व्यक्ती यांनी त्यांच्या कामाचा भाग म्हणून बैठका आयोजित केल्यास, शासकीय अधिका-यांनी अशा बैठकांना उपस्थित न राहण्याबाबत जबाबदारी घ्यावी व जिल्ह्यात दौरा आयोजित केल्यास त्यांनी अशा दौ-यांत त्यांच्याबरोबर सहभागी होण्याचे कटाक्षाने टाळावे. या सूचनांच्या अनुपालनात शासकीय अधिका-यांकडून कुचराई झाल्यास ते शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतील.

वरील सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात व त्यांना त्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना द्याव्यात.

या परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

सु. रामनूर्ती,
मुख्य सचिव.

प्रति,

सर्व मंत्री/राज्यमंत्री,
सर्व अपर मुख्य सचिव/सर्व प्रधान सचिव/सर्व सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व खाते प्रमुख.

---------

मान्यता दर्जा दिलेल्या व्यक्तींनी आयोजित केलेल्या बैठकांना शासकीय अधिकाऱ्यांनी उपस्थित न राहण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक मुस-1095/प्र.क्र.1/एक,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 31 मे, 1995.

वाचा :- (1) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: मुस-1092/प्र.क्र.65/एक, दिनांक 1 ऑगस्ट, 1992.

## प रि प त्र क

संदर्माधीन शासन परिपत्रकान्वये मान्यता दर्जा दिलेल्या व्यक्तींनी आयोजित केलेल्या कोणत्या बैठकांना शासकीय अधिकाऱ्यांनी उपस्थित राहू नये, याबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. वरील परिपत्रकातील सूचनांचे पालन योग्य रित्या शासनाच्या सर्व पातळीवरील अधिकाऱ्यांकडून होणे आवश्यक आहे. हे पुन्हा एकदा सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे. तरी वरील संदर्भातील परिपत्रकातील सूचनांचा पुनरुच्चार करून त्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात आणि त्यातील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेतली जावी, अशी विनंती आहे.

शरद उपासनी,
मुख्य सचिव.

प्रति,

मुख्य मंत्री (माहितीसाठी),
उप मुख्यमंत्री(माहितीसाठी),
सर्व मंत्री/राज्यमंत्री (माहितीसाठी),
सर्व अपर मुख्य सचिव/सर्व प्रधान सचिव/सर्व सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिनस्त कार्यालयांचे विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.

---

मा. न.मु. रोवा/सा.प्र.वि./एच-230(अ)(4000-6-95)

मंत्र्यांचा दर्जा दिलेल्या व्यक्तींनी आयोजित केलेल्या बैठकांना शासकीय अधिकाऱ्यांनी उपस्थित न राहण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : मुस-२०००/प्र.क्र.३२/एक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २३ ऑगष्ट, २०००.

वाचा : (१) शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्रमांक : तापसू १०९०/सीआर ४०/योजना-५, दि. ३० जून, १९९०

(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : मुस १०९२/प्र.क्र. ६५/ एक, दि. १ ऑगस्ट, १९९२

(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : मुस १०९५/प्र.क्र. १/ एक, दि. ३१ मे, १९९५

## परिपत्रक

संदर्भाधीन शासन परिपत्रकांस अनुसरुन स्पष्ट करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रकांन्वये देण्यात आलेल्या सूचना शासकीय अधिकाऱ्यांनी, मा. मंत्रीमहोदयांचा दर्जा असलेल्या व्यक्तींनी आयोजित केलेल्या बैठकींसाठी उपस्थित न राहण्याबद्दल व त्यांच्या दौऱ्यात सहभागी न होण्याबद्दल सिमीत होत्या. मात्र शासकीय अधिकाऱ्यांना अशा व्यक्तींनी चर्चेसाठी किंवा भेटीसाठी बोलाविले गेल्यास, संबंधित विभागाच्या मंत्रीमहोदयांच्या पूर्व मान्यतेने अशा भेटीसाठी ते जावू शकतील. यावेळी शासनाकडील गोपनीय अथवा संवेदनशील माहिती देण्याचे नम्रपणे टाळावे.

(अ. ना. बोंगिरवार)
मुख्य सचिव

प्रति,

मा. मुख्यमंत्री,
मा. उप मुख्यमंत्री,
सर्व मंत्री / राज्यमंत्री,
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग (त्यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख यांच्या निदर्शनास आणाव्यात)